सत्यमेव जयते

● जानेवारी २०१९ ● वर्ष: चौथे ● अंक : पहिला

# निवडणूक वार्ता

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

International Conference-2018

Better Elections For Healthier Democracy

State Election Commission, Maharashtra

१ जुलै २०१८ ते ३१ डिसेंबर २०१८ पर्यंतचा संक्षिप्त आढावा




मुंबई येथे २५ ऑक्टोबर २०१८ रोजी राज्य निवडणूक आयोगातर्फे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेनिमित्त आयोजित प्रदर्शनाबाबत माहिती घेताना राज्यपाल सी. विद्यासागर राव. शेजारी राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे, विधानसभेचे विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे– पाटील, आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने आदी.

# आंतरराष्ट्रीय स्तरावर देवाण-घेवाण



राज्य निवडणूक आयोगाच्यादृष्टीने सन २०१८ मधील शेवटची सहा महिने अतिशय महत्वपूर्ण होती. या कालावधीत आयोगाने काही महत्वाचे आदेश निर्गमित केलेत. त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात ऑक्टोबर २०१८ मध्ये एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

सुधारित आदेशानुसार नोटाला सर्वाधिक मते मिळाल्यास फेरनिवडणूक घेण्यात येईल. नोटासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या तत्वांचे परिपूर्णपणे पालन करण्यासंदर्भात व चांगल्या उमेदवारांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने हे पाऊल उचलले आहे. त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्रे दाखल करताना उमेदवारांना आता शपथपत्रात उत्पन्नाचा स्त्रोत व शासकीय निमशासकीय संस्थांसोबत केलेल्या करारांचादेखील तपशील देणे बंधनकारक करण्यात आले आहे. उमेदवारांना शपथपत्रांमध्ये आपल्या प्रभागाच्या विकासासंदर्भातील आपला दृष्टिकोन (व्हिजन) नमूद करणे आवश्यक आहे.

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्या राजकीय पक्षाने पाच वर्षात किमान एका स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कमीत कमी एका जागेवर निवडणूक लढविणे आवश्यक असेल. अन्यथा संबंधित पक्षाची नोंदणी रद्द होऊ शकते, हाही महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या इतिहासात प्रथमच आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. 'सुदृढ लोकशाहीसाठी निकोप निवडणुका' हा या परिषदेचा विषय होता. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांचा सहभाग उल्लेखनीय होता. त्यात 'मुंबई जाहीरनामा' घोषित करण्यात आला. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे विविध विषयांवर आपसातील सहकार्य वाढविण्यासाठी राष्ट्रकुल स्थानिक स्वराज्य संस्था मंच (सीएलजीएफ) सोबत सामंजस्य करार करण्यात आला. त्याचबरोबर राज्यात विविध ठिकाणी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि निवडणूकविषयक तज्ज्ञांच्या परिषदाही घेण्यात आल्या.

'निवडणूक वार्ताच्या' या अंकात वर नमूद सर्व घटनाघडामोडींचा थोडक्यात आढावा घेतला आहे. ऐतिहासिक नोंदींच्यादृष्टीने हा अंकदेखील संदर्भासाठी उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास आहे.

**ज. स. सहारिया**

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

**निवडणूक वार्ता**

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

## मार्गदर्शन आणि संकल्पना

**श्री. ज. स. सहारिया**
**राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र**

## प्रबंध संपादक

**श्री. किरण कुरुंदकर**
**सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

## संपादकीय मंडळ

| | |
|---|---|
| **श्री. राजाराम झेंडे**<br>सहसचिव | **श्री. अविनाश सणस**<br>प्रभारी उपायुक्त |
| **श्री. रवींद्र धुरजड**<br>उपजिल्हाधिकारी | **श्रीमती आरती सरवदे**<br>सहायक आयुक्त |
| **श्रीमती मनीषा मोहिते**<br>तहसीलदार | **श्री. अतुल जाधव**<br>कक्ष अधिकारी |
| **श्री. संजय सावंत**<br>कक्ष अधिकारी | **श्रीमती रत्नप्रभा बेले**<br>कक्ष अधिकारी |
| **श्रीमती सुमन आरोलकर**<br>कक्ष अधिकारी | **श्रीमती प्रणाली घोंगे**<br>सहायक आयुक्त |
| **श्री. वैभव सापळे**<br>सहायक गटविकास अधिकारी | **विशेष सहाय्य :**<br>श्री. समीर राणे<br>श्री. विनोद चव्हाण |

## संपादक

**श्री. जगदीश मोरे**
जनसंपर्क अधिकारी




## अनुक्रमणिका

१) कार्यशाळांच्या माध्यमातून विचारमंथन/५

२) आंतरराष्ट्रीय परिषद/७

३) सीएलजीएफसोबत सामंजस्य करार/१७

४) 'ईडेग'ची स्थापना/१८

५) तर राजकीय पक्षांची नोंदणी रद्द/१९

६) उत्पन्नाचा स्त्रोत बंधकारक /२०

७) नोटा जिंकल्यास फेरनिवडणूक/२१

८) प्रभाग रचनेपासून प्रतिबंधात्मक उपाययोजना/२२

९) सन २०१८ अखेरच्या निवडणुका/२३

- **प्रकाशक :** राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
- **प्रकाशन क्रमांक :** SEC/P.N.38/2019-1/Newsletter-7
- **मांडणी व मुद्रक :** कॉन्सेप्ट कम्युनिकेशन, मुंबई.
- **छायाचित्रे :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई

- 'निवडणूक वार्ता' ही सहामाही गृहपत्रिका असून ती खासगी वितरणासाठी आहे.

# कार्यशाळांच्या माध्यमातून विचारमंथन

भारतीय राज्य घटनेतील ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीच्या रौप्यमहोत्सवानिमित्ताने राज्य निवडणूक आयोगाने सन २०१७- १८ मध्ये विविध उपक्रम राबविले. त्यात विभागीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा/ कार्यशाळांचा समावेश आहे. या उपक्रमांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित विविध विषयांवर व्यापक चर्चा करण्यात आली. त्यात विविध मान्यवर सहभागी झाले होते. महत्वपूर्ण सूचना आणि शिफारसीदेखील समोर आल्या आहेत.

## मुंबईत एक दिवशीय कार्यशाळा

मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने 'लोकशाही, निवडणुका व सुशासन' या आनुषंगाने ६ जुलै २०१८ रोजी मुंबई येथे निवडणूक या विषयातील तज्ज्ञांची व अभ्यासकांची एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. निवडणुकांमधील अधिकाधिक लोकसहभाग, आर्थिक



*मुंबई विद्यापीठात ६ जुलै २०१८ रोजी आयोजित निवडणूक विषयक तज्ज्ञांच्या कार्यशाळेत बोलताना राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया. या कार्यशाळेत आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने, डॉ. राजस परचुरे, डॉ. टी. आर. रघुनंदन, डॉ. मृदुल निळे, डॉ. अजित रानडे, डॉ. बालसिंग राजपुत, श्री. भीम रासकर, डॉ. जगदीप चोकर आदी मान्यवर सहभागी झाले होते.*

बळाच्या दुरुपयोगाला प्रतिबंध करणे, निवडणुकीतील सोशल मीडियाचा वापर, सुप्रशासनासाठी लोकशाही व निवडणूक संस्थेची स्थापना आणि चालना यावर या कार्यशाळेत विचारमंथन झाले.

राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांच्या प्रमुख उपस्थितीत ही कार्यशाळा झाली. गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. राजस परचुरे, डॉ. टी. आर. रघुनंदन, डॉ. मृदुल निळे, डॉ. अजित रानडे, डॉ. बालसिंग राजपुत, श्री. भीम रासकर, डॉ. जगदीप चोकर आदी मान्यवरांनी या कार्यशाळेत आपले विचार व्यक्त केले.

## तज्ज्ञांच्या विभागीय कार्यशाळा

राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने जानेवारी–फेब्रुवारी २०१८ मध्ये विविध ठिकाणी विभागीय कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे सप्टेंबर–ऑक्टोबर २०१८ मध्ये विविध ठिकाणी निवडणूक विषयक तज्ज्ञांच्या विभागीय कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. मुंबईत ६ जुलै २०१८ रोजी आयोजित तज्ज्ञांच्या कार्यशाळेनंतर विभागीय स्तरावरदेखील अशा कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात, अशी संकल्पना पुढे आली होती. त्यामुळे अमरावती, नागपूर, नवी मुंबई, धुळे, पुणे आणि औरंगाबाद येथे अशा प्रकारच्या कार्यशाळा घेण्यात आल्या. या कार्यशाळांमध्ये निवडणुकीसंदर्भातील तज्ज्ञ, अभ्यासक, अधिकारी/ कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी आदी सहभागी झाले होते.

| विभाग | कार्यशाळेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|
| अमरावती | अमरावती | १ सप्टेंबर २०१८ |
| नागपूर | नागपूर | १९ सप्टेंबर २०१८ |
| कोकण | नवी मुंबई | २७ सप्टेंबर २०१८ |
| नाशिक | धुळे | २७ सप्टेंबर २०१८ |
| पुणे | पुणे | २९ सप्टेंबर २०१८ |
| औरंगाबाद | औरंगाबाद | ६ ऑक्टोबर २०१८ |

## राजकीय पक्षांच्या विभागीय कार्यशाळा

मुंबई येथे ७ मे २०१८ रोजी राजकीय पक्षांची राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मुक्त, निर्भय व पारदर्शक निवडणुका आणि राजकीय पक्ष' या विषयावर या कार्यशाळेत विचारमंथन झाले. त्याच धर्तीवर अमरावती, नाशिक व पुणे येथे सप्टेंबर २०१८ मध्ये विभागीय कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. या विभागीय कार्यशाळेत विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, निवडणुकीशी संबंधित अधिकारी/ कर्मचारी आणि राज्य निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

| कार्यशाळेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|
| अमरावती | १ सप्टेंबर २०१८ |
| राहुरी | १ सप्टेंबर २०१८ |
| पुणे | २९ सप्टेंबर २०१८ |

या कार्यशाळांच्या माध्यमातून व्यापक विचारमंथन झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिकाधिक निर्भय, मुक्त आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत विविध मान्यवरांनी आपले विचार मांडले. काही मुद्दे राज्य शासनाशी संबंधित; तर काही मुद्दे राज्य निवडणुका आयोगाशी संबंधित होते.

# आंतरराष्ट्रीय परिषद



*मुंबई येथे २५ ऑक्टोबर २०१८ रोजी राज्य निवडणूक आयोगातर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी विविध पुस्तकांचे प्रकाशन करताना राज्यपाल सी. विद्यासागर राव. सोबत ग्रामविकास, महिला व बालकल्याण मंत्री पंकजा मुंडे, विधानसभेचे विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे-पाटील, राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने, 'एडीआर'चे संस्थापक विश्वस्थ अजित रानडे आदी.*

भारतीय संविधानातील ७३ आणि ७४ व्या दुरुस्तीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त राज्य निवडणूक आयोगातर्फे मुंबई येथे २५ आणि २६ ऑक्टोबर २०१८ रोजी 'सुदृढ लोकशाहीसाठी निकोप निवडणुका' या विषयावर दोन दिवशीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी राष्ट्रकुल स्थानिक स्वराज्य संस्था मंच (सीएलजीएफ, लंडन), इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर डेमोक्रसी अँड इलेक्ट्रोल असिस्टन्स (इंटरनॅशनल आयडिया, स्टॉकहोम), मुंबई विद्यापीठ, पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) आणि रिसोर्स अँड सपोर्ट सेंटर फॉर डेमोक्रसी (आरएससीडी) या संस्थांचे 'नॉलेज पार्टनर' म्हणून सहकार्य लाभले.

राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील प्रमुख पाहुणे होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप झाला. वित्त व नियोजन मंत्री सुधीर

मुनगंटीवार आणि विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे प्रमुख पाहुणे होते.

राष्ट्र उभारणीच्या कार्यात स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्य ते स्थान मिळणे अपेक्षित आहे. त्यांच्या सुशासनासाठी निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात निवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीचा हाच गाभा आहे. त्यास २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या वाटचालीचा आढावा घेतानाच जागतिक स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्थान आणि त्यांच्या निवडणुकांसंदर्भातील जागतिक स्थिती जाणून घेण्याच्यादृष्टीने व विचारांचे आदानप्रदान करण्याच्या उद्देशाने ही परिषद आयोजित केली होती.



## गुन्हेगारी पार्श्वभूमीचे उमेदवार नको

राजकारणाचे गुन्हेगारीकरण थांबविण्यासाठी कुठल्याही राजकीय पक्षाने गुन्हेगारी पार्शभूमीच्या व्यक्तीला उमेदवारी देऊ नये. लोकशाही मूल्यांच्या जपवणुकीसाठी आणि मतदार जागृतीसाठी शाळा महाविद्यालयांमध्ये 'डेमोक्रशी क्लब' स्थापन करायला हवेत. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवर विचार आणि संकल्पनांच्या आदानप्रदानासाठी 'डिजिटल प्लॅटफॉर्म' निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

– **श्री. सी विद्यासागर राव**, राज्यपाल, महाराष्ट्र

## लोकप्रतिनिधींची क्षमता वृद्धिंगत व्हावी

'एक राष्ट्र एक निवडणूक' या उपक्रमात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचादेखील समावेश आवश्यक आहे; तसेच केवळ आंदोलनासंदर्भात गुन्हे असल्यास राजकीय व्यक्तींना सरसकट गुन्हेगार ठरवू नये. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींचीक्षमता वृद्धिंगत झाली पाहिजे. त्याचबरोबर मतदार याद्या बिनचूक असाव्यात आणि सक्तीच्या मतदानाबाबत विचारमंथन झाले पाहिजे.

– **श्री. देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री, महाराष्ट्र



## आंतरराष्ट्रीय स्तरावर आदान- प्रदान




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील आव्हाने, या निवडणुकांचे महत्व आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील निवडणूकविषयक घडामोडी जाणून घेण्यासाठी; तसेचसंकल्पना व विचारांचे आदान-प्रदान या दोन दिवसांत होणे अपेक्षित आहे. या माध्यमांतून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे महत्व आणि गांभीर्य अधोरेखित करण्याचा प्रयत्न आहे. आयोगाच्या गरजेप्रमाणे राज्य शासनाने निधी व मनुष्यबळ उपलब्ध करून दिले पाहिजे.

– **श्री. ज. स. सहारिया**, राज्य निवडणूक आयुक्त

## खर्चाबाबत विरोधाभास



निवडणुकीच्या काळात उमेदवारांवर खर्चाचे बंधन असते;परंतु एरवी काहीच बंधन नसते. या विरोधाभासासंदर्भात सखोल चिंतनाची आवश्यकता आहे. चांगल्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. कारण सुदृढ लोकशाहीसाठी निकोप निवडणुका आणि चांगली निवड अपेक्षित आहे. शंभर टक्के मतदानासाठीदेखील प्रयत्न झाले पाहिजेत, असे मत श्री. मुनगंटीवार यांची व्यक्त केले.

## पारदर्शकता दोन्ही बाजूने असावी



मतदार आणि उमेदवार अशा दोन्ही बाजूने पारदर्शकता असायला हवी. कारण लोकशाहीत प्रजेच्या हातात सत्तेच्या किल्ल्या असतात. त्याचबरोबर लोकशाहीचा सर्वंकष विचार करताना समाजमाध्यमांचा होणारा गैरवापर आणि त्यावर निवडणुकांमध्ये होणारा खर्च रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना केल्या पाहिजेत. सक्तीच्या मतदानासंदर्भातही व्यापक विचारमंथनाची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन श्रीमती मुंडे यांनी केले.

## निवडणूक प्रक्रिया सुलभ असावी



निवडणूक आयोगानेदेखील निवडणूक प्रक्रिया अधिक सुलभ केली पाहिजे, कारण जात वैधता प्रमाणपत्र वेळेवर सादर न करू शकणाऱ्या लोकप्रतिनिधींना अपात्र ठरविले जाते. यात कुणाचा दोष असतो, हे सांगणे अवघड असले तरी त्यावर उपाय शोधला पाहिजे. एकूणच या निवडणुकांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी एकच कायदा असायला हवा. संविधानातील तत्वांचा भंग होईल. असा कुठलाही कायदा किंवा नियम नसावा, अशी अपेक्षा श्री. मुंडे यांनी व्यक्त केली.

## आयोगाची स्वायत्तता राखावी



सुदृढ लोकशाहीसाठी राज्य निवडणूक आयोगाची स्वायत्तता आणि स्वतंत्र स्थान राखणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा पूर्णत:स्वतंत्र आहे, याचे भान राज्य शासनाने कायम राखले पाहिजे. राज्य निवडणूक आयोगाने निर्भिडपणे आपली संविधानिक जबाबदारी पार पाडावी; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींसाठी प्रशिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे, असे सूचना श्री. विखे- पाटील यांनी केली.

उद्‍घाटन आणि समारोप समारंभांव्यतिरिक्त पाच विविध विषयांवर तपशीलवार चर्चा झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर एक व्यासपीठ निर्माण झाले पाहिजे. त्या माध्यमातून निवडणुकीशी संबंधित घटकांमध्ये जागृती निर्माण करणे, अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, विविध विचार व संकल्पनांचे आदान- प्रदान, संशोधन, आदींची व्यवस्था झाली पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांचे व्यावसायिक संघटन उभे राहिले पाहिजे. राज्य निवडणूक आयोगाने स्थापित केलेल्या 'इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रशी अँड इलेक्शन्स फॉर गुड गव्हर्नन्स'ला प्रोत्सहन दिले पाहिजे. या मुद्यांवर अनेकांनी भर दिला.

## परिषदेतील चर्चासत्रांचे विषय

- जनतेकडील लोकशाहीचे स्वामित्व
- निवडणुकांतील पैशांचा गैरवापर
- वंचित, उपेक्षित व दुर्बल घटकांचा सहभाग
- खोट्या बातम्या व समाज माध्यमांचा गैरवापर
- निवडणुकीशीसंबंधित विविध घटकांची भूमिका
- आंतरराष्ट्रीय स्तरावरील उल्लेखनीय संकल्पनांचे आदानप्रदान)

राज्य निवडणूक आयोगाने मुक्त, निर्भय व पारदर्शक निवडणुकांसाठी राज्य घटनेने प्रदान केलेल्या स्वायत्ततेचा आणि अधिकारांचा योथोचित वापर केला पाहिजे. मतदारसंघाच्या/ प्रभागाच्या विकासासंदर्भातील उमेदवारांचा दृष्टिकोन नामनिर्देशनपत्रात नमूद करणे, ही नावीन्यपूर्ण बाब आहे. त्यास मतदारांच्या माहितीसाठी व्यापक प्रसिद्धीदेखील दिली पाहिजे. निवडणुकांमधील गैरप्रकार टाळण्यासाठी 'येलो कार्ड' आणि 'रेड कार्ड' ही संकल्पना अंमलात आणावी. गैरवर्तवणुकीसंदर्भात प्रारंभी उमेदवाराला दोनदा 'येलो कार्ड' दाखवावे. तिसऱ्यांदा अनुचित प्रकार घडल्यास 'रेड कार्ड' दाखवून थेट कार्यवाही करावी. उमेदवारांचे गैरवर्तवणूक किंवा आचारसंहिता भंगासंदर्भातील माहिती मतदारांना व्हावी, यासाठी संकेतस्थळ असायला हवे.

## देश विदेशातील मान्यवर

विविध देशांतील निवडणूक यंत्रणा आणि इतर विविध आंतरराष्ट्रीय संस्थांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले होते. त्यात अमेरिका, इंग्लंड, स्वीडन, बांग्लादेश, भूतान, इंडोनेशिया, श्रीलंका इत्यादी देशांचा समावेश होता. देशातील १५ राज्य निवडणूक आयोगांचे राज्य निवडणूक आयुक्त/ प्रतिनिधीदेखील सहभागी झाले होते. अभ्यासक, पत्रकार, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते आदींनीही परिषदेला हजेरी लावली.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासंदर्भातील गैरसमज दूर झाले पाहिजेत. समाजमाध्यमांवरील खोट्या बातम्यांना आळा घालण्याकरिता सर्व घटकांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे, असे विचार विविध मान्यवरांनी व्यक्त केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकट करण्यासाठी आणि सुशासनाकरिता कालमर्यादेत राज्य शासनाने निधी, अधिकार आणि मनुष्यबळाचे त्यांच्याकडे हस्तांतरण केले पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नवनिर्वाचित विशेषत: महिला, वंचित आणि दुर्बल घटकातील लोकप्रतिनिधींकरिता प्रभावी प्रशिक्षणाची व्यवस्था शासनाने केली पाहिजे. गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींना रोखण्यासाठी; तसेच आर्थिक बळाचा आणि समाजमाध्यमांचा गैरवापर रोखण्याकरिता प्रभावी कायदा करायला हवा. सर्वांना समान संधीच्यादृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कोणालाही दोनपेक्षा जास्त वेळ प्रतिनिधित्व मिळता कामा नये. राज्य निवडणूक आयोगाला आवश्यक तेवढा निधी, साधनसामग्री आणि मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे, अशा आशयाची मांडणी अनेक वक्त्यांनी केली.

परिषदेमध्ये झालेल्या व्यापक चर्चेच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोग निश्चितच कृतिशील पावले उचलेल. अन्य संबंधित बाबी राज्य शासनाशी संबंधित आहेत. त्याबाबत शासन निश्चितच सकारात्मक विचार करेल. एकूणच आशयाचा विचार करता आंतरराष्ट्रीय परिषद फलदायी ठरली, असे म्हणता येईल. विशेष म्हणजे त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाची जबाबदारी आणखी वाढली आहे, असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल.



*मुंबई येथे २६ ऑक्टोबर २०१८ रोजी राज्य निवडणूक आयोगातर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी विविध पुस्तकांचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. यावेळी वित्त व वन मंत्री सुधीर मुनगंटिवार, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे, राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने आदी.*

## 'मुंबई जाहीरनामा'

आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपापूर्वी 'मुंबई जाहीरनामा' घोषित करण्यात आला. या जाहीरनाम्यात शिफारशींचे दोन प्रमुख भाग केले आहेत. पहिल्या भागात विविध लोकशाही देश आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी संबंधित शिफारशी आहेत. दुसऱ्या भागात भारतातील विविध घटक विशेषत: राज्य निवडणूक आयोगासंदर्भातील शिफारशी आहेत. या दोन्हींतील ठळक शिफारशी अशा:

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यादृष्टीने विचारविनिमयासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ निर्माण करावे.
- आंतरराष्ट्रीय व्यासपीठाच्या माध्यमातून विचार, संकल्पना, उल्लेखनीय बाबी आणि निवडणुकीतील तंत्रज्ञानाच्या वापराबाबत आदान प्रदान झाले पाहिजे.
- प्रशिक्षण, व्यावसायिक विकास, विविध घटकांमध्ये जनजागृती आदींच्या माध्यमांतून क्षमता वृद्धिंगत केली पाहिजे.
- प्रशिक्षण कार्यक्रमांचे मूल्यमापन आणि स्वतंत्र निवडणूक निरीक्षक नियुक्तीसंदर्भात आपसात कार्यवाही झाली पाहिजे.
- निवडणूक विषयक महत्वाच्या मुद्यांवर काम करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या 'सुप्रशासनासाठी लोकशाही व निवडणूक संस्थे' (IDEGG) ला प्रोत्साहन द्यायला हवे.
- विशिष्ट कालमर्यादेत स्थानिक स्वराज्य संस्थांकडे निधी कार्ये आणि यंत्रणेचे हस्तांतरण झाले पाहिजे.
- सर्व लोकप्रतिनिधी विशेषत: महिला आणि वंचित घटकांतील लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षणासाठी यंत्रणा विकसित केली पाहिजे.
- गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींना निवडणूक लढविण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी निवडणूक सुधारणा केल्या पाहिजे.
- एखाद्या लोकप्रतिनिधीला जास्तीत जास्त केवळ दोन वेळाच स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये प्रतिनिधीत्व करता यायला हवे.
- आर्थिक बळाचा आणि सोशल मीडियाचा दुरूपयोग टाळण्यासाठी निवडणूक सुधारणांची आवश्यकता आहे.
- राज्य निवडणूक आयोगाने राज्य घटनेने प्रदान केलेल्या शक्तीचा अधिकाधिक वापर करून पूर्णत: आपले स्वतंत्र अस्तित्व कायम राखले पाहिजे.
- निवडणुकांसंदर्भात काही पोकळी असल्यास राज्य निवडणूक आयोगाने त्यांची पूर्तता करावी.
- सर्व उमेदवारांनी आपल्या मतदारसंघाच्या किंवा प्रभागाच्या विकासासंदर्भातील योजनांची माहिती द्यावी आणि तिला प्रसिद्धी द्यावी.
- आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या उमेदवारांसंदर्भात येलो आणि रेड कार्डची पद्धत अवलंबविली गेली पाहिजे.
- महालेखापालांच्या सूचितील लेखापरीक्षकांकडून राजकीय पक्ष आणि उमेदवारांच्या खर्चाचे लेखापरीक्षण केले पाहिजे.



*आंतरराष्ट्रीय परिषदेनिमित्त आयोजित प्रदर्शनात राज्य निवडणूक आयोगाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची बायोस्कोपमधील छायाचित्रे बघताना मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस.*




*आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी झालेल्या विविध देशांतील वेगवेगळ्या संस्था आणि निवडणूक आयोगांचे प्रतिनिधी.*



*मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, श्री. मुनगंटिवार व श्री. मुंडे यांच्यासोबत आंतरराष्ट्रीय परिषदेचे मान्यवर वक्ते.*



*आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी झालेले भारतातील विविध राज्यांचे राज्य निवडणूक आयुक्त.*



*मुंबई येथील हॉटेल द लीलामध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी सजविण्यात आलेले प्रवेशद्वार.*




*आंतरराष्ट्रीय परिषदेनिमित्त आयोजित प्रदर्शनात राज्य निवडणूक आयोगाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे फलक.*




*आंतरराष्ट्रीय परिषदेचे नॉलेज पार्टनर असलेल्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या प्रतिनिधींचा मा. मुख्यमंत्री यांच्याहस्ते गौरव करण्यात आला. अनुक्रमे– श्री. गेरथ वॉल व श्रीमती अनुया कुवर (सीएलजीफ), श्री. एरीक सप्लंड (इंटरनॅशनल आयडिया), डॉ. आजित रानडे (एडीआर), डॉ. मृदुल निळे (मुंबई विद्यापीठ) आणि श्री. भीम रासकर (आरएससीडी) आणि श्री. गायकवाड (गोखले इन्स्टिट्यूट, पुणे).*



*आंतरराष्ट्रीय परिषदेत मतदारजागृतीसंदर्भात पथनाट्य सादर करताना मुंबई विद्यापीठ व एसएनडीटी महिला विद्यापीठाचे विद्यार्थी-विद्यार्थीनी.*








*आंतरराष्ट्रीय परिषदेच्या पहिल्या दिवशीच्या चर्चासत्रानंतर परदेशातील उपस्थित मान्यवरांना महाराष्ट्र आणि भारतीय संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात मुंबई विद्यापीठ व एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या विविध विद्यार्थी व विद्यार्थीनी विविध नृत्याविष्कार सादर केले. त्यातील काही क्षणचित्रे.*

# ‘सीएलजीएफ’सोबत सामंजस्य करार

लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या तुलनेने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात संशोधन, विश्लेषण आणि सुधारणांविषयक फारच अत्यल्प प्रमाणात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर हालचाल असते. ही बाब लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत समन्वय साधून विचार आणि संकल्पनांचे आदान- प्रदान करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रथमच राज्य निवडणूक आयोगाने राष्ट्रकुल स्थानिक स्वराज्य संस्था मंच (सीएलजीएफ) सोबत २६ सप्टेंबर २०१८ रोजी पुढील दोन वर्षांसाठी सामंजस्य करार केला.

सामंजस्य करारावर राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया आणि सीएलजीएफचे महासचिव डॉ. ग्रेग मुनरो यांनी विविध वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सह्या केल्या. राज्याच्या ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव श्री. असीम गुप्ता, आयोगाचे तत्कालीन सचिव श्री. शेखर चन्ने यावेळी उपस्थित होते. सीएलजीएफचे मुख्यालय लंडन येथे असून ही संस्था राष्ट्रकुल देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवित असते.

## करारातील ठळक बाबी

- नावीन्यपूर्ण कल्पना, माहिती, ज्ञान आणि उल्लेखनीय कार्याचे आदान- प्रदान.
- नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी उपाययोजनांची आखणी करणे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात आंतरराष्ट्रीय व्यासपीठ तयार करणे.
- निवडणूक अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाची यंत्रणा निर्माण करणे.
- निवडणूक निरीक्षकांसंदर्भात व्यवस्था विकसित करणे.
- समन्वयातून नवनवीन प्रयोगांना आणि संशोधनाला चालना देणे.



*मुंबई येथे २६ सप्टेंबर २०१८ रोजी राज्य निवडणूक आयोग आणि राष्ट्रकुल स्थानिक स्वराज्य संस्था मंच (सीएलजीएफ) यांच्यातील सामंजस्य कराराप्रसंगी उपस्थित डावीकडून सीएलजीएफच्या श्रीमती अनुया कुवर, सीएलजीएफचे महासचिव डॉ. ग्रेग मुनरो, राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया आणि ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव श्री. असीम गुप्ता.*

# 'ईडेग' (IDEGG) ची स्थापना

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि राज्य निवडणूक आयोगाला विविध घटकांकडून मिळणारं कमी महत्व, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील पुरेशा माहितीचा अभाव, मोठ्यासंख्येने असलेल्या निवडणूक अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, आचारसंहितेची अंमलबजावणी आदी मुद्यांवर निरंतर चिंतनाची आणि कार्यवाहीची आवश्यकता आहे. त्यासाठी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्यादृष्टीने भारतीय आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापन संस्था (IIIDEM) कार्यरत आहे. भारत निवडणूक आयोगाने या संस्थेची स्थापना केली आहे. त्याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील संशोधन, ज्ञान संवर्धन, प्रशिक्षण आणि क्षमता वृद्धी आदींसाठी संस्था असावी अशी संकल्पना २०१६ मध्ये पुढे आली आणि या अनौपचारिक संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम हाती घेण्यात आले.

संस्थेची संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाने विविध उपक्रम हाती घेतले. मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था आदींच्या माध्यमातून २० पेक्षा जास्त संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आले. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून नोव्हेंबर २०१७ मध्ये राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले. २०१८ च्या प्रारंभी विभागीय परिषदा घेण्यात आल्या. २६ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या कालावधीत २०१८ पासून लोकशाही पंधरवडा साजरा करण्यास सुरुवात झाली. राजकीय पक्षांसाठी राज्यस्तरीय आणि विभागीय परिषद घेण्यात आल्या. या उपक्रमांची उपयुक्तता लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने 'सुशासनासाठी लोकशाही आणि निवडणूक संस्थे'ची ६ नोव्हेंबर २०१८ रोजी स्थापना केली.

## संस्थेची वैशिष्ट्ये आणि कार्ये

- सुदृढ लोकशाहीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिकाधिक निकोप करण्याच्यादृष्टीने ज्ञानवर्धन करणे आणि ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करणे.
- विचार, संकल्पना आणि उल्लेखनीय कामांचे आदान- प्रदान करणे, निवडणूक यंत्रणेसाठी प्रशिक्षणाची व्यवस्था, नवनवीन आव्हानांवर मात करण्यासाठी उपाययोजना करणे.
- विविध आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत सहकार्य वाढवून माहितीचे व संकल्पनांचे आदान- प्रदान करणे.
- शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ, वरिष्ठ अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली सल्लागार समितीची नियुक्ती करणे.
- कमीत- कमी पायाभूत सुविधा आणि मनुष्यबळाच्या आधारे विविध व्यक्ती आणि संस्थांच्या मदतीने वाटचाल करणे.

# तर राजकीय पक्षांची नोंदणी रद्द

राज्य निवडणूक आयोगाने सन २००४ पासून राजकीय पक्षांची नोंदणी सुरू केली आहे. त्यासंदर्भात सध्या 'राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००९', 'महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९', 'राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ (सुधारीत २०१६)' आणि 'महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) (सुधारीत) आदेश, २०१७' हे आदेश अस्तित्वात आहेत. त्यानुसार राजकीय पक्षांसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडे कार्यवाही चालते. 'राजकीय पक्ष सुधारीत आदेश, २०१८' नुसार राजकीय पक्ष नोंदणी प्रक्रियेच्या अनुषंगाने काही सुधारणा करण्यात आल्या आहेत.

## किमान एक जागा लढवावी

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्या राजकीय पक्षाने आयोगाच्या या २५ जुलै २०१८ च्या सुधारीत आदेशानुसार पुढील पाच वर्षात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कमीत कमी एका जागेवर निवडणूक लढविणे आवश्यक असेल. अन्यथा संबंधित पक्षाची नोंदणी रद्द होऊ शकते. विशेष म्हणजे संबंधित राजकीय पक्ष, उमेदवाराने केवळ अर्ज दाखल करून तो मागे न घेता प्रत्यक्ष निवडणूक लढविणे बंधनकारक आहे.

## आश्वासन पूर्तता अहवाल आवश्यक

राजकीय पक्षांना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या वेळी प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्याची एक अधिकृत प्रत संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे; तर नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे ही प्रत द्यावी लागते.

संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेत सत्ता स्थापन करणाऱ्या किंवा सत्तेत सहभागी असलेल्या पक्षास जाहीरनाम्यातील आश्वासनांच्या पूर्ततेचा वार्षिक अहवाल मतदारांच्या माहितीसाठी जाहिरातीद्वारे अथवा संकेतस्थळाद्वारे प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. त्याची प्रत संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा जिल्हाधिकाऱ्याकडे देणेदेखील बंधनकारक केले आहे. सलग दोन वर्षे आश्वासन पूर्ततेचा वार्षिक अहवाल सादर न करणाऱ्या राजकीय पक्षाची नोंदणी रद्द करण्याची तरतूद सुधारीत आदेशात केली आहे.

## जिल्ह्यातही अर्ज स्वीकारण्याची सुविधा

राजकीय पक्ष नोंदणीसाठीचा अर्ज आता थेट राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. राजकीय पक्षाचे मुख्य कार्यालय असलेल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज सादर करावा लागतो. या अर्जाची संपूर्ण तपासणी करून व अटींची पूर्तता झाल्यावर संबंधित जिल्हाधिकारी तो अर्ज स्वयंस्पष्ट प्रस्तावासह राज्य निवडणूक आयोगाकडे दोन महिन्यांच्या आत पाठवितात. पुढील सर्व प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाकडून पार पाडली जाते. भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त नोंदणीकृत पक्षास (राष्ट्रीय अथवा राज्यस्तरीय) राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीसाठी थेट 'सचिव, राज्य निवडणूक आयोग' यांच्याकडे अर्ज सादर करता येतो.

# उत्पन्नाचा स्त्रोत बंधकारक

राज्य निवडणूक आयोगाने प्रथमत: १९९७ मध्ये उमेदवारांकडून त्यांची मालमत्ता, गुन्हेगारी पार्श्वभूमी व शैक्षणिक अर्हता याबाबत शपथपत्र घेण्यास सुरूवात केली. त्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने २१ ऑक्टोबर १९९७ रोजी आदेश निर्गमित केले होते. त्या अनुषंगाने वेळोवळी विविध आदेशही निर्गमित करण्यात आले आहेत. आयोगाने १३ ऑगस्ट २०१८ रोजी शपथपत्राचा सुधारीत नमुना निर्गमित केला आहे. त्यात उमेदवारांना स्वत:च्या व त्याच्यावर अवलंबित असलेल्यांच्या उत्पन्नाचा स्त्रोत, उत्पन्नाचे व विविध करारांचे तपशील; तसेच पूर्वी निवडणूक लढविली असल्यासत्याबाबतची माहिती नमूद करणे बंधनकारक केले आहे.

महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवारांना शपथपत्र सादर करावे लागते. या शपथपत्रात प्रामुख्याने मत्ता व दायित्व, शैक्षणिक पात्रता आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीविषयक माहिती नमूद करावी लागते; परंतु सर्वोच्च न्यायालयाने १६ फेब्रुवारी २०१८ रोजी दिलेल्या निर्देशानुसार शपथपत्रात आता नवे बदल करण्यात आले आहेत. उमेदवाराच्या स्वत:च्या व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांच्या उत्पनाचा स्त्रोत आणि त्याबाबतचे मागील तीन वर्षांचे तपशील सादर करावे लागतात. त्यात शेती, नोकरी, व्यापार/ व्यवसाय, भांडवली नफा, बक्षिसे/ देणग्या व इतर उत्पन्नाचा तपशील द्यावा लागतो.



## करारांचा तपशील आवश्यक

उत्पन्नाच्या स्रोताप्रमाणेच उमेदवार आणि त्याच्यावरील अवलंबितांचे शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था इत्यादींसोबतच्या करारांचीदेखील माहिती द्यावी लागते. त्यात कराराचा विषय, कराराचा कालावधी, कराराची रक्कम, कराराची शपथपत्रे दाखल करतानाची सद्य:स्थिती, कराराबाबत विवाद झाला असल्यास त्याबाबतची माहिती देणे आवश्यक असते.

## संपत्तीच्या माहितीचा गोषवारा

उमेदवाराने यापूर्वी निवडणूक लढविली असल्यास, त्या निवडणुकीच्या वेळी शपथपत्राद्वारे सादर केलेल्या संपत्तीच्या माहितीचा गोषवारादेखील शपथपत्रात नमूद करणे आवश्यक आहे. त्यात यापूर्वी लढविलेल्या निवडणुकीचे नाव, निवडणुकीचे वर्षे, त्यावेळी जाहीर केलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेचे मूल्य, दायित्वे/ थकित रकमांचा गोषवारा इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.


## विकासाबाबत 'व्हिजन'

निवडून आल्यावर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राच्या विकासासाठी करणार असलेल्या उपाययोजनांचीही माहिती जास्तीत जास्त पाचशे शब्दांत नमूद करण्याची तरतूद राज्य निवडणूक आयोगाने केली आहे. मतदारांसाठी ही माहिती उपयुक्त ठरू शकते. यामुळे आपल्या प्रभागासाठी (वॉर्ड) उमेदवार काय करणार आहे, याची कल्पना मतदारांना होईल.

# नोटा जिंकल्यास फेरनिवडणूक

मा. सर्वोच्च न्यायालयाने एका रिट पिटिशनसंदर्भात (क्र.१६१/२०४) २७ सप्टेंबर २०१३ रोजी दिलेल्या निकालात नोटाची (None Of The above) सुविध उपलब्ध करून देण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने आपल्या १२ नोव्हेंबर २०१३ च्या आदेशान्वये सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर नोटा बटनाची सुविधा उपलब्ध करून दिली; परंतु नोटा पर्यायासमोर नोंदविलेल्या मतांची संख्या सर्वाधिक मते मिळालेल्या उमेदवारांच्या मतापेक्षा जास्त असली तरी त्या उमेदवाराला विजयी घोषित करण्यात येत नव्हते. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायलयाच्या आदेशाच्या तत्वांची पूर्णपणे पूर्तता होत नाही, असे विविध मान्यवर, राजकीय पक्ष आणि संशोधकांनी राज्य निवडणूक आयोगाच्या लक्षात आणून दिले होते. निवडणूक प्रक्रियेत मतदारांचा सहभाग वाढला पाहिजे, चांगले उमेदवार देण्यासंदर्भात राजकीय पक्षांवर दबाव आला पाहिजे, निवडणूक निकालांवर नकारात्मक मतांचंही प्रतिबिंब उमटले पाहिजे. आदी स्वरुपाची तत्वे मा. सर्वोच्च न्यायलयाच्या आदेशात जाणवतात. यासह न्यायालयाचे विविध आदेश आणि संबंधित कायद्यांतील तरतुदींचा अभ्यास केल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने नोटाच्या आपल्या आदेशात दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला.

राज्य निवडणूक आयोगाने त्या आनुषंगाने नोटासंदर्भात ६ नोव्हेंबर २०१८ रोजी सुधारित आदेश निर्गमित केले. त्यानुसार नोटाला 'फिक्शनल इलेक्टोरल कँडिटेट' समजण्यात येते. वैयक्तिकरीत्या सर्वच उमेदवारांना नोटापेक्षा कमी मते मिळाल्यास कुठल्याही उमेदवाराला




विजय घोषित केले जाणार नाही. एखाद्या उमेदवाराला आणि नोटाला समान मते मिळाल्यास संबंधित उमेदवाराला विजयी घोषित करण्यात येते. नोटाला सर्वाधिक मते मिळाल्यास फेरनिवडणूक घेण्यात येईल. त्यासाठी नव्याने नामनिर्देशनपत्र दाखल करावी लागतील. फेरनिवडणुकीत पुन्हा नोटाला सर्वाधिक मते मिळाल्यास पुन्हा फेरनिवडणूक घेण्यात येणार नाही. नोटाव्यतिरिक्त सर्वाधिक मते मिळालेल्या उमेदवारास विजयी घोषित करण्यात येईल.

नोटाला सर्वाधिक मते मिळाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निकाल जाहीर न करता त्यासंदर्भातील अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा. अहवाल प्राप्त झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोग अहवालाचा उचित अभ्यास करून फेरनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करेल. नोटासंदर्भातील ही सुधारणा केवळ शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अंमलात आणली आहे. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत ही सुधारणा लागू नाही.

# प्रभाग रचनेपासून प्रतिबंधात्मक उपाययोजना

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रत्यक्ष निवडणुकीऐवजी प्रभाग रचनेच्या कार्यवाहीपासूनच राबविल्या जातील; तसेच निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व निपक्ष: अधिकाऱ्यांकडूनच हाताळण्यात येतील, अशी तरतूद राज्य निवडणूक आयोगाने ३१ जुलै २०१८ च्या आदेशान्वय केली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालानुसार सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रत्यक्ष निवडणुकीऐवजी प्रभाग रचनेची कार्यवाही सुरू झाल्यापासूनच राबविणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे प्रामुख्याने प्रभाग रचना, विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन आणि प्रत्यक्ष निवडणुका असे तीन प्रमुख टप्पे असतात. आतापर्यंत सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रत्यक्ष निवडणूक जाहीर झाल्यापसूनच राबविल्या जात होत्या. त्यात हा बदल करण्यात आला आहे. त्याबाबत स्वतंत्र आदेश निर्मगमित करण्यात आला आहे.

## उपाययोजनेसंदर्भातील ठळक मुद्दे

- संबंधित विभाग आणि नियंत्रण अधिकाऱ्यांनी प्रभाग रचनेपासूनच कर्तव्यदक्ष, नि:पक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवडणुकीच्या कामासाठी नेमणूक करावी.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची संपूर्ण प्रक्रिया कर्तव्यदक्ष, नि:पक्ष व सचोटी असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यामार्फतच राबवावी.
- स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत संपण्याच्या दिनांकास सध्याच्या पदावर तीन वर्षे पूर्ण होत असलेल्या अधिकाऱ्यास निवडणुकीची कामे देण्यात येऊ नयेत.
- निवडणुकीची कामे हाताळणाऱ्या अधिकाऱ्याची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दोन महिन्यांपर्यंत सध्याच्या पदावरून बदली करू नये अथवा कार्यमुक्त करू नये.
- निवडणूक होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा संबंधित अधिकारी जिल्ह्याचा रहिवाशी असू नये; परंतु हा निकष जिल्हा संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत बंधनकराक राहणार नाही.
- प्रभाग रचनेची कार्यवाही सुरू झाल्यापासून पोलीस, उत्पादन शुल्क व इतर संबंधित विभागाने आवश्यक त्या सर्व प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात.
- जिल्हा व तालुका पातळीवर स्थापन करण्यात आलेल्या संनियंत्रण समित्यांनी सर्व बँका, पतपेढ्या इत्यादींशी समन्वय साधून मोठ्या व्यवहारांवर लक्ष ठेवावे.
- पैशांची व मद्याची अवैध मार्गाने होणारी वाहतूक व संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवावे.

# सन २०१८ अखेरच्या निवडणुका

राज्य निवडणूक आयोगातर्फे जुलै २०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीत विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक आणि रिक्तपदांच्या पोटनिवडणुका घेण्यात आल्या. सांगली- मीरज- कुपवाड, जळगाव, धुळे आणि अहमदनगर या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका या कालावधीत झाल्या. विविध १४ नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकाही झाल्या. धुळे, नंदुरबार, अकोला आणि वाशीम या जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या २३ पंचायत समित्यांची मुदत डिसेंबर २०१८ मध्ये संपत होत्या; परंतु न्यायालयीन प्रकरणामुळे या निवडणुका होऊ शकल्या नाहीत.

## महानगरपालिका निवडणूक

सांगली-मिरज-कुपवाड व जळगाव महानगरपालिकेच्या सार्वत्रिक;तसेच वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या एका रिक्तपदाच्या पोटनिवडणुकीसाठी १ऑगस्ट २०१८ रोजी मतदान घेण्यात आले. मतमोजणी३ऑगस्ट २०१८ रोजी झाली. त्यासाठी आयोगाने २५ जून २०१८ रोजी निवडणूक कार्यक्रम घोषित केला होता.

सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेची मुदत १३ ऑगस्ट २०१८ रोजी संपत होती. एकूण २० प्रभागांतील ७८ जागांसाठी मतदान झाले. त्यापैकी महिलांसाठी ३९ जागा राखीव होत्या. अनुसूचित जातीसाठी ११, अनुसूचित जमातीसाठी १, तर नागरिकांच्या मागासप्रवर्गासाठी २१ जागा राखीव होत्या.

जळगाव महानगरपालिकेची मुदत १९ सप्टेंबर २०१८ रोजी संपत होती. एकूण १९ प्रभागातील ७५ जागांसाठी मतदान झाले. त्यापैकी महिलांसाठी ३८ जागा राखीव होत्या. अनुसूचित जातीसाठी ५, अनुसूचित जमातीसाठी ४; तर नागरिकांच्या मागासप्रवर्गासाठी २० जागा राखीव होत्या.


धुळे व अहमदनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ९ डिसेंबर २०१८ रोजी मतदान झाले.मतमोजणी १० डिसेंबर २०१८ रोजी झाली. त्यासाठी आयोगाने १ नोव्हेंबर २०१८ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता.

धुळे महानगरपालिकेची मुदत २९ डिसेंबर २०१८ रोजी संपत होती. एकूण १९ प्रभागातील ७४ जागांसाठी मतदान झाले. त्यापैकी महिलांसाठी ३७ जागा राखीव होत्या. अनुसूचित जातीसाठी ६, अनुसूचित जमातीसाठी ५, तर नागरिकांच्या मागासप्रवर्गासाठी २० जागा राखीव होत्या.

अहमदनगर महानगरपालिकेची मुदतदेखील २९ डिसेंबर २०१८ रोजी संपत होती. एकूण १७ प्रभागातील ६८ जागांसाठी मतदान झाले. त्यापैकी महिलांसाठी ३४ जागा राखीव होत्या. अनुसूचित जातीसाठी ९, अनुसूचित जमातीसाठी १, तर नागरिकांच्या मागासप्रवर्गासाठी १८ जागा राखीव होत्या.

## नगरपरिषदा/ नगरपंचायत निवडणुका

विविध जिल्ह्यांतील एकूण १४ नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या या सहामाईत सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. त्याचबरोबर राजापूर नगरपरिषदेच्या अध्यक्षांच्या रिक्तपदासाठी आणि विविध ११ नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील सदस्यपदांच्या रिक्त जागांसाठीदेखील




पोटनिवडणूक घेण्यात आली. मोहाडी नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी एकही नामनिर्देशनपत्र दाखल झाले नव्हते. त्यामुळे तेथे निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. तुळजापूर व मंगरूळपीर या दोन नगरपरिषदांच्या अध्यक्षांच्या रिक्तपदाच्या निवडणुकीस उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे.

## नगरपरिषद/ नगरंपचायत सार्वत्रिक निवडणूक जुलै ते डिसेंबर २०१८ मधील अध्यक्ष पदांची पक्षीय बलाबल

| अ.क्र. | मतदान | नगरपरिषद/ नगरपंचायतींची संख्या | भारतीय जनता पार्टी | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | इंडियन नॅशनल काँग्रेस | शिवसेना | अपक्ष | आघाडी/ फ्रंट | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जुलै २०१८ | ६ | २ | ० | २ | १ | १ | ० | ० | ६ |
| २ | ऑगस्ट २०१८ | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| ३ | ऑक्टोबर २०१८ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| ४ | डिसेंबर २०१८ | ६ | ३ | ६ | १ | १ | ० | १ | ० | ६ |
| ५ | **एकूण** | **१४** | **५** | **६** | **३** | **३** | **१** | **२** | **०** | **१४** |

## नगरपरिषद/ नगरंपचायत सार्वत्रिक निवडणूक जुलै ते डिसेंबर २०१८ मधील सदस्य पदांची पक्षीय बलाबल

| अ.क्र. | मतदान | नगरपरिषद/ नगरपंचायतींची संख्या | एकूण प्रभाग | एकूण जागा | जाहीर निकाल | भारतीय जनता पार्टी | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | इंडियन नॅशनल काँग्रेस | शिवसेना | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्ष | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जुलै २०१८ | ६ | ९५ | १०६ | १०६ | ५२ | ८ | २५ | ७ | १ | ६ | ७ |
| २ | ऑगस्ट २०१८ | १ | १३ | २७ | २७ | ४ | ० | २ | १६ | ० | ४ | १ |
| ३ | ऑक्टोबर २०१८ | १ | १७ | १७ | १७ | ७ | ० | ० | ० | ० | ९ | १ |
| ४ | डिसेंबर २०१८ | ६ | ७१ | १०९ | १०९ | ३७ | ६ | २७ | १४ | ० | १८ | ७ |
| ५ | **एकूण** | **१४** | **१९६** | **२५९** | **२५९** | **१००** | **१४** | **५४** | **३७** | **१** | **३७** | |

## जिल्हा परिषद/ पंचायत समिती निवडणुका

धुळे, नंदुरबार, अकोला आणि वाशीम या जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या २३ पंचायत समित्यांची मुदत डिसेंबर २०१८ मध्ये संपत होत्या. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने २७ जुलै २०१८ च्या पत्रान्वये प्रभाग (गण व गट) रचनेचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर व औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल करण्यात आल्या.

राज्य शासनाने महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६२ च्या कलम १२ (२) (सी) मध्ये आवश्यक ती दुरूस्ती पुढील तीन महिन्यांत करावी व तोपर्यंत जैसे थे स्थिती ठेवण्यात यावी, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने संबंधित याचिकांवर दिल्यामुळे या निवडणुकांची प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाकडून स्थगित

करण्यात आली. सद्य:स्थितीत या चारही जिल्ह्यांतील विद्यमान जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या पंचायत समित्या कार्यरत राहतील असे शासनाच्या ग्रामविकास विभागाने २७ डिसेंबर २०१८ च्या पत्रान्वये जाहीर केले आहे.

## ग्रामपंचायत निवडणूक

आयोगातर्फे ऑक्टोबर २०१८ ते फेब्रुवारी २०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या १ हजार ५७ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक आणि सरपंचाच्या रिक्त ४३ पदांच्या पोटनिवडणुकांसाठी २३ ऑगस्ट २०१८ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. यातील काही ग्रामपंचायतींच्या निवडणुका बिनविरोध झाल्या होत्या. यासह इतर विविध कारणांमुळे प्रत्यक्षात ९३० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक आणि १० सरपंचपदांच्या पोटनिवडणुकांसाठी २६ सप्टेंबर २०१८ रोजी मतदान झाले. मतमोजणी २७ सप्टेंबर २०१८ रोजी पार पडली. एकूणच संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडली. त्यासाठी सर्वांचे सहकार्य लाभले.



*राज्य निवडणूक आयोगाचे नवनियुक्त सचिव श्री. किरण कुरुंदकर यांचे स्वागत करताना राज्य निवडणूक आयुक्त ज.स. सहारिया. शेजारी मावळते सचिव श्री. शेखर चन्ने.*



*सचिवालय जिमखाना आयोजित क्रिकेट स्पर्धेत सहभागी झालेला राज्य निवडणूक आयोगाचा संघ. या संघाने प्रथमच उपांत्य फेरीपर्यंत धडक मारली.*




*मुंबई येथे २६ ऑक्टोबर २०१८ रोजी राज्य निवडणूक आयोगातर्फे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेनिमित्त आयोजित प्रदर्शनातील सापसिडीच्या खेळासंदर्भात माहिती घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, वित्त व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटिवार, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने आदी.*




## राज्य निवडणूक आयोग

पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२.


०२२ २२०४६९०९

sec.mh@gov.in / mahasecpro@gmail.com

https://mahasec.maharashtra.gov.in

https://mahasecnews.blogspot.in

https://www.instagram.com/maharashtrasec

https://www.facebook.com/MaharashtraSEC

https://www.twitter.com/maharashtrasec

https://www.youtube.com/channel/
UCBecPYpVQš1P8-ZqMUIG-1w